MSCBA

# THE MAHARASHTRA STATE CO-OPERATIVE BANKS' ASSOCIATION LTD., MUMBAI

"Shilpin Centre", 40, G.D. Ambekar Road, Wadala, Mumbai - 400 031.
**Tel. :** (022) 24106841 / 24106843 / 46037618 ∗ **Mob.:** 9137599300
**E-mail :** mscba@mscba.info ∗ **Web site :** www.mscba.info

**Ref. No.:** वार्षिक सर्वसाधारण सभा / ६20 / २०२६-२०२७ **Date:** ०१ सप्टेंबर २०२६

## सभेची नोटीस

दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स् असोसिएशन लि. , मुंबईची ८७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, **मंगळवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी, दुपारी १२.०० वाजता "नागपूर नागरीक सहकारी बँक लि., नागपूर, ७९, डॉ. आंबेडकर चौक, सेंट्रल ॲव्हेन्यु, नागपूर, जिल्हा - नागपूर - ४४०००८"** यांच्या सभागृहात आमदार मा.श्री. संजय भेंडे, अध्यक्ष, दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचारविनीमय करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे.
कृपया सदर सभेस आपण उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

## सभेपुढील विषय

१. मागील दिनांक २३ जुलै २०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृ-तांत वाचून कायम करणे व ठरावावर झालेल्या कार्यवाहीची माहिती घेणे.

२. असोसिएशनच्या दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, आयव्ययपत्रक व त्या तारखेच्या ताळेबंदपत्रकास मंजूरी देणे.

३. सन २०२६ - २०२७ सालासाठी तयार केलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०२५ - २०२६ सालच्या अंदाजपत्रकातील खर्चाच्या मंजूर रकमांपेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देणे.

४. सन २०२५ - २०२६ चा जमाखर्च मंजूर केल्यानंतर अतिरिक्त शिल्लक रक्कम संस्थेच्या पोटनियम क्र.५१ नुसार राखीव निधीस व उर्वरीत रक्कम इतर निधीस वर्ग करण्यास मंजूरी देणे.

५. संस्थेच्या सन २०२५ - २०२६ सालातील देय रकमांच्या तरतूदीस मंजूरी देणे.

६. संस्थेच्या सन २०२६ - २०२७ सालाकरीता नेमलेल्या अंतर्गत हिशेबतपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

७. संस्थेच्या सन २०२६ - २०२७ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

८. सन २०२५ - २०२६ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालांची नोंद घेणे.

९. सन २०२५ - २०२६ च्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालावरील दोषदुरुस्ती अहवालास मंजूरी देणे.

१०. असोसिएशनचे पोटनियम क्र. ११ ( ब ) मधील तरतुदीनुसार ज्या बँकांची वार्षिक वर्गणी सतत तीन वर्ष व त्यावरील वर्षाची वर्गणी आलेली नाही त्यांचे सभासदत्व रद्द करुन त्यांची येणे असलेली वर्गणीची रक्कम तरतुदीमधून निर्लेखीत करण्यास मंजूरी देणे.

११. महाराष्ट्रातील ज्या जिल्हा / विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन आपल्या सभासद झाल्या आहेत. त्यांचा समावेश त्या त्या भागातील नागरी सहकारी बँकांच्या मतदार संघात समाविष्ट करून घेणेबाबत विचार विनिमय करणे.

१२. सन २०२६-२०२७ सालाकरिता सभासद बँकांसाठी वार्षिक कार्यक्रम ठरविणेबाबत विचारविनिमय करणे.

१३. संस्थेच्या सन २०२५ - २०२६ या वर्षाच्या ८७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मंजूरी देणे.

१४. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणा-या विषयांवर विचारविनिमय करणे.

कळावे,

आपला विश्वासू

( विरसेन गुरव )
मुख्य कार्यकारी अधिकारी

**टिप :-** १. गणपूर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने सुरु होईल. त्यासाठी गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

२. कृपया बॅकेच्या प्रतिनिधींनी सभेस येतेवेळी नोटीसची प्रत आणावी.

३. वार्षिक सर्वसाधारण सभेस येणा-या प्रतिनिधींनी आपली नावे आंम्हास नियोजनाच्या सोईकरिता **शुक्रवार, दिनांक २५ सप्टेंबर २०२६** पूर्वी कळवावीत ही विनंती.